नियमीत फौजदारी खटला क्र. **१२१/२०२५**
निशाणी क्र. **७५/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रविण जनार्दन पेडणेकर** |
| वय सुमारे | : | ५१ वर्षे, व्यवसाय : ज्वेलरीचे दुकान |
| निवासस्थान | : | मु. कुंभारवाडा, उरण, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती स्नेहा नाईक यांचेमार्फत**:

माझा ज्वेलरीचा व्यवसाय आहे. माझ्या भावाचे नाव सुनिल जनार्दन पेडणेकर असे आहे. त्याची मुलगी सायली सुनिल पेडणेकर ही घटनेच्या वेळी एल.एल.बी.च्या पहिल्या वर्षात गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, चर्चगेट, मुंबई येथे शिकत होती.

०२. दि. ०४/०३/२०१० रोजी घटना घडली. सायली सकाळी ०८:३० वाजता कॉलेजला जायची व दुपारी १:३० वाजेपर्यंत घरी परत यायची. तिला एक अनोळखी नंबरवरुन २—३ वेळा कॉल आला होता. तो कॉल मयुर घरत याचा होता. तो तिला सांगत होता की, तू माझ्याबरोबर प्रेमसंबंध ठेव व नाही ठेवलेस तर मी तुला बरबाद करीन. ही गोष्ट माझा भाऊ सुनिल पेडणेकर याला समजली. त्यावेळी सायं. ८:३० वाजता आम्ही मयुर घरत याला जाब विचारण्यासाठी गेलो. त्यावेळी मी स्वत:, सुनिल पेडणेकर, महेश बालदी, आचल मुकादम व गणेश पाटील असे आम्ही त्याला जाब विचारण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी मयुर घरत, त्याचे वडील काशिनाथ घरत व आई नुतन घरत हे आम्हाला बाहेरच असलेल्या मेडीकल स्टोअर्सजवळ भेटले. भाऊ सुनिल

पेडणेकर याने मयुरला जाब विचारला की, तू असे का केलेस? त्यावर मयुर, त्याचे आईवडील हे जोरजोरात ओरडून आम्हाला आईवडीलांवरुन शिवीगाळ करु लागले. सुनिल पेडणेकर याने त्याला शांत राहण्यास सांगितले. तर तो धावत मेडीकल स्टोअर्समध्ये गेला व सुरी आणून मला, माझा भाऊ व सर्वांना जीवे मारण्याची धमकी देवू लागला. आम्ही मयुरला पकडण्याचा प्रयत्न केला परंतु तो धावू लागला व रस्त्यावर जावून पडला. त्यानंतर आम्हाला समजले की तो हॉस्पीटलमध्ये ॲडमीट आहे. सुनिल पेडणेकर याने पोलीस ठाण्यात जावून तक्रार दाखल केली. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. आरोपी व त्याच्या आईवडीलांनी आम्हा सर्वांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अंकुश मोरे यांचेमार्फत</u>** :

०३. हे मला माहीत नाही की, सन २०१० साली महेश बालदी हे उरणचे नगराध्यक्ष होते. महेश बालदी यांना मी माझ्या लहानपणापासून शाळेपासून ओळखतो. हे मला माहीत आहे की, महेश बालदी हे भारतीय जनता पक्षाचे पूर्वीपासून कार्यकर्ते आहेत. माझा भाऊ व महेश बालदी हे वर्गमित्र होते.

०४. दि. ०४/०३/२०१० रोजी आम्ही सायलीला सोबत जाब विचारण्यासाठी घेवून गेलो नव्हतो. जाब विचारायला जाण्यापूर्वी मी स्वत: सायलीशी वैयक्तीक बोललो होतो. सन २०१० साली सायली एल.एल.बी. च्या पहिल्या वर्षात शिकत होती. त्यावेळी आरोपी मयुर हा इंजिनियरिंग करत होता. हे म्हणणे खरे आहे की, गव्हर्नमेंट लॉ कॉलेज हा फक्त लॉ कॉलेज आहे व

तिथे इंजिनियरिंगचे कोणतेही वर्ग नाहीत. मयुर कोठून इंजिनियरिंग करत होता हे मला माहीत नाही. घटनेपूर्वी मी आरोपी मयुर याला पाहिले होते. आरोपी हा उरण मधीलच आहे व उरण हे छोटे शहर आहे त्यामुळे मी त्याला पूर्वीपासून ओळखतो. आरोपी ज्या बिल्डींगमध्ये राहतो ती बिल्डींग मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०४/०३/२०१० रोजी आम्ही आरोपीला त्याच्या घरी जावून भेटलो नव्हतो. जाब विचारण्यासाठी आम्ही महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम यांना ते आमचे मित्र असल्यामुळे सोबत घेवून गेलो होतो. त्यावेळी महेश बालदी काय काम करत होते हे मला माहिती नाही. गणेश पाटील, आचल मुकादम काय काम करत होते हे मला माहीत नाही. महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम यांच्याशी आमची दररोज भेट होत होती. आम्ही त्या तिघांना विचारले नव्हते की, त्यांचे उपजिवीकेचे काय साधन आहे. हे म्हणणे खरे नाही की, महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम हे गुंड प्रवृत्तीचे असून त्यांना फक्त आरोपीला मारण्यासाठी व धमकावण्यासाठी घेवून गेलो होतो.

०५.	हे म्हणणे खरे आहे की, ओंकार मेडीकल स्टोअर्स हे उरण शहरात आहे. आम्ही ज्यावेळी तेथे गेलो त्यावेळी मेडीकल स्टोअर्सच्या आत मेडीकलवाला आत उभा होता. आमची बोलाचाल मेडीकलच्या समोर झाली होती. मी सुरी स्वत: पाहिली होती. ती सुरी साधारणपणे आठ ते दहा इंच लांब होती. माझ्या हे लक्षात नाही की, मेडीकलवाला भांडण सोडवण्यास आला होता अथवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावर रहदारी होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या रहदारीमधील कोणीही भांडण सोडवण्यासाठी आले नाही.

मयुरला कुठे कुठे लागले हे मला माहीत नाही. मला हे माहीत नाही की, त्यानंतर मयुर बरेच दिवस हॉस्पीटलमध्ये ॲडमीट होता. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझा भाऊ व महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम यांना कुठेही लागले नाही. हे मला माहीत नाही की, मयुरच्या आईवडीलांचे वय त्यावेळेला ५० ते ५५ वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझा भाऊ व महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम यांनी मयुरला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यावर केस होवू नये म्हणून माझ्या भावाने खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुतणीला कोणत्याही प्रकारची विचारपूस केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, धाक दाखवण्यासाठी आरोपीला आम्ही मारहाण केली होती.

०६. आरोपीची व सायलीची भेट कशी झाली होती यासंदर्भात जाब विचारेपर्यंत मला माहिती नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही शहानिशा न करता जावून मयुरला मारहाण केली होती व त्याच्या डाव्या हाताला फ्रॅक्चर झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, मयुरने मला वैयक्तीक कोणतीही धक्काबुक्की केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी आरोपी मयुर एकटा होता व आम्ही पाच जण त्याला मारहाण करत होतो. माझा जबाब पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जबाब देताना मयुरच्या आईवडीलांनी धक्काबुक्की व शिवीगाळ केली असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझा जबाब नोंदवला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पाच जणांनी मिळून मयुरला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मयुर

आमच्याविरुद्ध फिर्याद देणार होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आमच्याविरुद्ध फिर्याद देईल म्हणून आम्ही त्याच्याविरुद्ध खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०३/११/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१२१/२०२५**
निशाणी क्र. **७८/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सायली सुनिल पेडणेकर** लग्नानंतर **सायली माधव कुलकर्णी** |
| वय सुमारे | : | ३५ वर्षे, व्यवसाय : गृहीणी |
| निवासस्थान | : | उरण, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती स्नेहा नाईक यांचेमार्फत**:

०१. घटना घडली त्यावेळी मी उरणमध्ये राहात होते. त्यावेळी आमचे एकत्र कुटुंब होते आमच्या कुटुंबामध्ये आईवडील, भाऊ, काका, काकी, त्यांची दोन मुले आणि आजीआजोबा असे राहात होतो. त्यावेळी मी चर्चगेट येथील गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये लॉ करत होते. मी बोटीने जात असे. त्यावेळी मी मोबाईल वापरत होते परंतु आता मला त्याचा क्रमांक आठवत नाही.

०२. घटना दि. ०४/०३/२०१० रोजी घडली. त्यादिवशी सकाळी ८:३० वाजता मी कॉलेजला जायला निघाले. त्यावेळी मी टॅक्सीतून उतरत असताना मला कॉल आला की, ‘मी मयुर बोलतोय, माझे तुझ्यावर प्रेम आहे. तू माझ्यासोबत प्रेमसंबंध ठेवले नाहीस तर मी तुला बर्बाद करीन, संपवून टाकीन.’ मी तो कॉल कट केला. थोड्या वेळाने मला पुन्हा दुसरा कॉल आला. पुन्हा हेच सांगितले. पुन्हा तिसरा कॉल आला. त्यावेळी देखील हेच सांगितले. त्यानंतर पुन्हा एकदा कॉल आला. त्यावेळी देखील हेच सांगितले. मला चार वेगवेगळ्या क्रमांकावरुन कॉल आले होते. मला ते क्रमांक लक्षात नाहीत.

०३. मी त्यानंतर कॉलेजमधून घरी आले. कॉल आल्यामुळे मी घाबरले होते. मी घरी आल्यावर सदर बाब माझ्या वडीलांना सांगितली व माझा मोबाईल त्यांना दिला. त्यानंतर रात्री ८:३० वाजता माझे वडील सुनिल पेडणेकर, माझे काका प्रविण पेडणेकर, त्यांचे मित्र महेश बालदी, गणेश पाटील व आचल मुकादम असे त्याला सदर गैरप्रकाराबाबत विचारायला गेले. तिथे त्याचे आईवडील देखील होते. त्यांनी तिकडे आरडाओरडा सुरु केला. म्हणून माझ्या वडीलांनी त्यांना शांत राहण्यास सांगितले. तिथे बाजूलाच असलेल्या मेडीकल स्टोअरमधून मयुर घरत याने धारदार चाकू आणला आणि शिवीगाळ केली आणि माझ्या वडीलांना म्हणाला की, तुला आताच्या आता खल्लास करुन टाकीन. मयुरला सर्वजण थांबवायला गेले. तो तेथून पळून जात होता आणि तो खाली पडला. त्याच्या लागले. वडीलांनी पोलीस ठाण्यात जावून त्याची तक्रार केली. मी आरोपीला ओळखते. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अंकुश मोरे यांचेमार्फत</u>** :

०४. मी जन्मापासून उरण येथेच राहते. माझे शिक्षण यु.इ.एस्. या शाळेमध्ये झाले. हे म्हणणे खरे आहे की, मयुर देखील त्या शाळेतच शिकत होता. हे म्हणणे खरे आहे की, मी मयुर याला शाळेपासून ओळखते. हे म्हणणे खरे आहे की, गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये इंजिनियरींगची सोय नाही.

०५. मी सायंकाळी मयुरला विचारण्यासाठी वडीलांसोबत गेले नव्हते. मयुरला विचारणा करण्यासाठी पाच जण गेले होते. पाच जण म्हणजे माझे वडील, माझे काका प्रविण पेडणेकर, महेश बालदी, गणेश पाटील व आचल मुकादम हे होते. मयुर व मी शाळेमध्ये बोलत होतो, भेटत होतो. मी लॉ कॉलेजमध्ये बारावी

नंतर ॲडमिशन घेतले होते. शाळा १२ वी पर्यंत होती. २०१० मध्ये मी लॉच्या पहिल्या वर्षात होते. घटनेपूर्वी माझा मोबाईल क्रमांक मयुर याला माहिती होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनेपूर्वी आरोपी माझ्यासोबत असे काही बोलला नव्हता.

०६. मी महेश बालदी यांना लहानपणापासून ओळखते. हे म्हणणे खरे आहे की, ते त्यावेळी उरण येथील नगराध्यक्ष होते. हे म्हणणे खरे आहे की, ते पूर्वीपासून भारतीय जनता पक्षाचे काम करतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील पूर्वीपासून महेश बालदी यांचे सहकारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गणेश सदाशिव पाटील हे महेश बालदींच्या ओळखीचे आहेत. हे मला माहीत नाही की, गणेश पाटील यांनी म.न.से. कार्यकर्त्याला मारहाण केल्याबाबत व्हीडीओ आठ दिवसांपूर्वी आला होता. हे मला माहीत नाही की, महेश बालदी यांच्याकरीता गणेश पाटील यांनी मारहाण केली होती.

०७. सन २०१० मध्ये गणेश पाटील हे मला माहिती होते परंतु मी त्यांना ओळखत नव्हते. आचल मुकादम यांना मी पहिल्यापासून ओळखते. उरण हे छोटे गाव असून सर्व एकमेकांना ओळखतात. मयुर कुठे राहात होता हे मला माहिती होते.

०८. मला हे आठवत नाही की, मी पोलीसांना जबाब देताना सांगितले होते की, चारही वेळेला तेच वाक्य मला मयुर फोनवर बोलला होता. मी पोलीसांना जबाब देताना सांगितले होते की, मी टॅक्सीमधून उतरताना मला पहिला कॉल आला होता.

०९. मी पोलीसांना जबाब देताना सांगितले होते की, मला कॉल आल्यानंतर मी घाबरुन लगेचच घरी आले. मी पोलीसांना जबाब देताना सांगितले

होते की, सदरची घटना मी वडीलांना सांगितली व वडीलांना मोबाईल दिला. पोलीसांनी माझ्या जबाबात मी टॅक्सीने जात असताना मला कॉल आला असे लिहीलेले बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी टॅक्सीतून उतरताना मला कॉल आला होता हे मी खोटे सांगत आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की, मला चार वेळा कॉल येवून मला तेच वाक्य बोलला होता हे मी खोटे सांगत आहे.

११. मी पूर्ण कॉलेज त्या दिवशी केले नव्हते. मी वडीलांना मोबाईल दिला हे पोलीसांना जबाब देताना सांगितले नव्हते. मी चार नंबरवरुन कॉल आला हे पोलीसांना सांगितले होते.

१२. हे म्हणणे खरे आहे की, घरी आल्यानंतर मी लगेचच पोलीस ठाण्यात गेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मयुरला लागल्यानंतर माझे वडील पोलीस ठाण्यात गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या दिवशी पोलीस ठाण्यात गेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी मयुरच्या आईवडीलांनी जावून पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

१३. हे म्हणणे खरे नाही की, मयुरने मला चार कॉल केले व मला म्हणाला की, 'मी मयुर बोलतोय, माझे तुझेवर प्रेम आहे. तू माझ्यासोबत प्रेमसंबंध ठेवले नाहीस तर मी तुला बर्बाद करीन, संपवून टाकीन.' हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर रात्री ८:३० वाजता माझे वडील सुनिल पेडणेकर, माझे काका प्रविण पेडणेकर, त्यांचे मित्र महेश बालदी, गणेश पाटील व आचल मुकादम असे त्याला सदर गैरप्रकाराबाबत विचारायला गेले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तिथे त्याचे आईवडील देखील

होते त्यांनी तिकडे आरडाओरडा सुरु केला म्हणून माझ्या वडीलांनी त्यांना शांत राहण्यास सांगितले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तिथे बाजूलाच असलेल्या मेडीकल स्टोअरमधून मयुर घरत याने धारदार चाकू आणला आणि शिवीगाळ केली आणि माझ्या वडीलांना म्हणाला की, तुला आताच्या आता खल्लास करुन टाकीन. मयुरला सर्वजण थांबवायला गेले, तो तेथून पळून जात होता आणि तो खाली पडला आणि त्याच्या लागले हे मी खोटे सांगत आहे.

१४. हे म्हणणे खरे नाही की, वडील सुनिल पेडणेकर, माझे काका प्रविण पेडणेकर, महेश बालदी, गणेश पाटील, आचल मुकादम, निलेश मधुकर पाटील, माधव कुलकर्णी, सागर घोसाळकर, महेश यादव वर्तक यांनी मयुरला खूप मारहाण केली होती व त्यामध्ये त्याला खूप दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मयुर याला मारहाण केल्याबाबत त्याच्या आईवडीलांनी तक्रार केली होती त्यामुळे आम्ही खोटी तक्रार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. **( एम्. बी. अत्तार )**
दिनांक : **११/१२/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१२१/२०२५**
निशाणी क्र. **७९/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **गणेश सदाशिव पाटील** |
| वय सुमारे | : | ४२ वर्षे, व्यवसाय : व्यापार |
| निवासस्थान | : | बापूशेटवाडी, रुम नं. २२, ता. उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती स्नेहा नाईक यांचेमार्फत</u>**:

०१. दि. ०४/०३/२०१० रोजी सुनिल पेडणेकर यांची मुलगी सायली ही चर्चगेट येथील कॉलेजला मुंबई येथे जात होती. रोज सकाळी ८:३० वाजता जाते व दुपारी १:३० वाजता घरी परत येते. दि. ०४/०३/२०१० रोजी सकाळी ती लॉचने कॉलेजला जात होती. तेथून ती टॅक्सी पकडून जात असताना मयुर घरत याने तिला वेगवेगळ्या क्रमांकावरुन कॉल करुन 'तू मला आवडतेस, माझ्याशी प्रेमसंबंध ठेव नाहीतर मी तुला बर्बाद करुन टाकीन' अशी धमकी दिली असे सुनिल पेडणेकर याने मला सांगितले.

०२. त्या दिवशी रात्री ८:३० वाजता सुनिल पेडणेकर, मी, महेश बालदी, आचल मुकादम असे सानेगुरुजी बालोद्यान गार्डनजवळ गेलो असता मयुर घरत व त्याच्या आईवडीलांना गैरप्रकाराबाबत विचारणा केली असता त्यांनी आम्हाला भांडण करण्याची सुरुवात केली. त्यानंतर मयुर घरत याला आम्ही शांत राहण्यास सांगितले. त्यानंतर मयुर घरत याने ओमकार मेडीकलमध्ये जावून धारदार चाकू आणून आताच्या आता ठार मारुन टाकीन अशी धमकी दिली. सुनिल पेडणेकर याला धमकी दिली. त्यानंतर त्याने आम्हाला धक्काबुक्की करुन

आईवडीलांनी अर्वाच्च शिवीगाळ केली. आम्ही मयुर घरतला पकडण्यास गेलो असता तो रस्त्यावर पडला असे आम्हाला हॉस्पीटलमध्ये गेलो असता समजले.

०३. आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अंकुश मोरे यांचेमार्फत** :

०४. सुनिल पेडणेकर आणि मी मित्र असल्यामुळे आमची ओळख आहे. सुनिल पेडणेकर मला घटना सांगण्यासाठी स्वत: आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यांना पोलीस ठाण्यात जावून तक्रार देवू असे सुचवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस आमच्यासोबत निलेश मधुकर पाटील, सागर घोसाळकर, माधव सुभाष कुलकर्णी असे होते.

०५. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आठ जण व मयुर घरत एकटा अशी त्यावेळी परिस्थिती होती. मयुर, त्याचे आईवडील व मी, सुनिल पेडणेकर, आचल मुकादम, प्रविण पेडणेकर असे होतो. आम्ही एवढेच होते. महेश बालदी आमच्यासोबत नव्हते. महेश बालदी यांना आम्ही पोलीस ठाण्यात जाईपर्यंत घटनेबाबत माहिती नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला सकाळची घटना सुनिल पेडणेकर यांनी सांगितली होती मुलीने सांगितली नव्हती.

०६. हे म्हणणे खरे नाही की, मी, सुनिल पेडणेकर, प्रविण पेडणेकर, महेश बालदी, आचल मुकादम, निलेश पाटील, माधव कुलकर्णी, सागर घोसाळकर, महेश वर्तक यांनी मयुर घरत याला जबर मारहाण केली होती. हे मला माहीत नाही की, सदर जबर मारहाणीची तक्रार मयुरच्या वडीलांनी पोलीस ठाण्यात दिल्यामुळे आम्ही खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आम्ही

मयुर घरत याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **११/१२/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१२१/२०२५**
निशाणी क्र. **९०/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०५** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सोमनाथ शांताराम सांडभोर** |
| वय सुमारे | : | ४२ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | मोठे नागाव, ता. उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती स्नेहा नाईक यांचेमार्फत</u>**:

०१. दि. ०४/०३/२०१० रोजी मला ए.पी.आय. दौंडकर यांनी पंचनाम्याकरीता बोलावले होते. घटनास्थळ मला फिर्यादी सुनिल पेडणेकर यांनी दाखवले. साने गुरुजी बालोद्यानाशेजारी ओंकार मेडीकल स्टोअर्सच्या समोर ४० फुटी पक्का डांबरी रस्ता आहे तेथे घटनास्थळ आहे. सुनिल पेडणेकर यांनी सांगितले की, मयुर घरत व त्याच्या आईवडीलांनी धक्काबुक्की करुन चाकू दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. घटनास्थळाच्या पूर्वेला ओंकार मेडीकल स्टोअर, पश्चिमेला भारत पॉवर लॉन्ड्री, दक्षिणेला पंचायत समिती, उरण रोड तर उत्तरेला ७० फुटांवर अपना बाजार चौक आहे. पंचनामा रात्री ९:३५ वाजता चालू झाला व १०:०५ वाजता संपला. इलेक्ट्रीक पोलच्या खाली पंचनामा उजेडात करण्यात आला होता. मी पंचनाम्यावर सही केली. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी, गुरव दुसरे पंच यांची व ए.पी.आय. दौंडकर यांची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ९१** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अंकुश मोरे यांचेमार्फत</u>** :

०२. मी जे. एन. पी. टी. पोर्टमध्ये कामाला आहे. दौंडकर साहेब माझ्या पूर्वीपासून ओळखीचे नव्हते. मी कामावरुन घरी जात असताना पोलीसांनी मला आवाज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी तेथे जाण्यापूर्वी पोलीस तेथे हजर होते. मला हे सांगता येणार नाही की, दुसरा पंच तेथे पूर्वीपासून हजर होता. घटनास्थळापासून पोलीस ठाणे किती अंतरावर आहे हे मला सांगता येणार नाही. मला यापूर्वी पंचनाम्यासाठी बोलावण्यात आले नव्हते. पोलीसांनी घटनास्थळावरुन काहीही जप्त केले नव्हते.

०३. मी पंचनाम्यापूर्वी पेडणेकर यांना ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, पेडणेकर यांच्यासोबत त्यांचे ४—५ मित्र तेथे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे मित्रही घटनेबाबत सांगत होते.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **०५/०१/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.